# सहल नव्हे वर्षासहल

रविवार दि. २७ जूलै २००८ रोजी महाराष्ट्र मंडळ, न्यूयॉर्कची सहल Hempstead Lake State Park येथे झाली. ही सहल पर्जन्यवृष्टीच्या मदतीमुळे वर्षासहल ठरली. सकाळपासून पावसाने आपली उपस्थीती दर्शवली होती तरीसुध्दा मंडळाच्या सभासदांनी आणि पाहुण्यांनी आपलीही उपस्थीती ५०च्या आसपास लावली.

महाराष्ट्र मंडळाच्या फलकाने दोन वृक्षांमध्ये आपले स्थान पटकावले आणि तेथे तो दिमाखाने पाहुण्यांच्या स्वागताला उभा राहीला. ११च्या दरम्यान हळुहळु सर्वजण जमा होऊ लागले. त्यानंतर टेपरेकॉरडरवरील मराठी गाणी, कोळी गीते, लोकगीते यांनी सर्व वातावरण संगीतमय झाले. सर्व टेबलांवर रंगीत टेबलक्लॉथ घालून वातावरण सुशोभीत झाले आणि मग कार्यक्रमाची सुरूवात झाली.

प्रथम संगीतखुर्चीचा खेळ झाला. खेळ खूपच रंगला. झसजसे गडी बाद होत होते तसतसे खेळाची रंगत वाढतच होती. आणि शेवटी विजयी ठरला आपला शिरीष मोहीले. बच्चेकंम्नी आपला ग्रुप करून खेळत होती. कोणी बॅटमिंटन खेळत होते तर कोणी बॉलने खेळत होते तर कोणी नुसतेच धावाधावी खेळत होते. प्रत्येकजण आपल्या परीने आनंद लुटीत होते. आणि एवढा वेळ दडी मारून बसलेला आमचा पाहुणा, त्यालाही आमच्यात सहभागी व्हायचे म्हणून आला. आम्हाला थोडे भिजवले, थंड केले आणि गेला.

आता सर्वांच्या पोटात कावकाव करायला लागले म्हणून जेवणाचा कायद्क्रम झाला. जेवणाचा बेत छान होता – आमरस, पुरी, छोले, पुलाव. सर्वांनी त्याचा मनसोक्त आनंद घेतला आणि ताजेतवाने होऊन खेळायला तयार झाले.

पुरूष कंम्नीने क्रिकेटचा संच आणला होता. खेळायला गडी मैदानात उतरले. फिल्डींग लागली. बॅटसमनने बॅट सरसावली आणि बॉलरने बॉल टाकला आणि क्रिकेट सुरू झाले. बघ्यांची गर्दी होतीच आणि खेळ रंगात आला.

येथे स्त्रीयांनीही आपले दोन गट केले आणि अंताक्षरीचा खेळ सुरू केला. त्याला तर इतका रंग चढला की एक से बढकर एक गाणी गायली जात होती. त्यानंतर पुरूषांचा क्रिकेट संपवून ते आले आणि त्यांनीपण गाण्यात भाग घेऊन अंताक्षरीला जोरदार रंग आणला. मग काय नुसती गाणीच गाणी. फक्त नाचायचेच बाकी होते. तितक्यातच कोणीतरी कलींगडाच्या लाल फोडी घेऊन आले. गाणी गातागाता कलींगडाचा आस्वादही घेऊन झाला.

आनंदाला नुसते उधाण आले होते आणि तेवढयातच त्यात भाग घ्यायला पर्जन्यराजा पुन्हा आला. मग मात्र आम्ही थांबायचे ठरवले. शेवटी सर्वांनी मनसोक्त पावसात भिजून घेतले आणि आपल्या घरचा रस्ता धरला.

– अरूंधती किन्नरे